**माध्यम प्रसिध्दीसाठी**

## प्रेस नोट

**!! अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळयात ओढुन तिचे अश्लील फोटो व्हायरल करणारा नराधम आरोपी सायबर पोलीसांच्या ताब्यात !!**

दि.11/12/2024 रोजी अज्ञात इसमाने फिर्यादीच्या व्यक्तीच्या नावाचे इन्टाग्राम या सोशल मिडीया साईटवर बनावट अकाऊंट तयार करुन त्यावर फिर्यादीचे अश्लील फोटो व्हायरल केल्याची ऑनलाईन तक्रार सायबर पोलीस स्टेशनला प्राप्त झाली.

त्याअनुषंगाने सदर इन्टाग्राम सोशल मिडीयावर बनावट खाते बनविणाऱ्या आरोपीतांचा शोध घेतले असता तपासा दरम्यान पिडीता व आरोपी यांचे दोन वर्षापुर्वी स्नॅपचॅट या सोशल मिडीयावर ओळख झाली होती. हळुहळु ओळखचे रुपांतर प्रेमात झाले.

सुमारे 1 वर्षापुर्वी आरोपीताने फुसलावुन पिडीतेच्या संमतीशिवाय तिला धुळे जिल्हयातील एका लॉजमध्ये घेवुन जावुन (सदर आरोपी लॉज यास ओयो या नावानो सबोधतो) तिच्याशी प्रेमसंबंध प्रस्थापीत केले व तिच्या संमतीशिवाय तिचे फोटो व  व्हीडीओ चित्रीकरणे केले. कालांतराने त्याच्यात वाद विवाद झाल्याने त्यांचे ब्रेकअप झाले. पिडीतेने आरोपीला सोशल मिडीयाच्या प्रत्येक ठिकाणी ब्लॉक करुन आरोपीशी बोलणे बंद केले.

त्यामुळे आरोपी चिडुन पिडीताच्या नावाने बनावट इंन्स्टाग्राम आयडी तयार करुन त्यामार्फत पिडीतेला संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतु तिथे देखील त्यास रिस्पॅान्स न मिळाल्याने आरोपीतांने पिडीताचे काढलेले अश्लील फोटो व व्हीडीओ सदरच्या बनावट इन्स्टाग्राम आयडीवरुन व्हायरल केले व पिडीतेच्या नातेवाइकांना व मित्रांना पाठविले.

या प्रकाराबाबत पिडीतेस प्रथम आरोपीवरच संशय व्यक्त केला परंतु आरोपी आत्मविश्वासाने सांगातले की, मी सदरची बनावट इन्स्टाग्राम आयडी बनवलेली नाही. परंतु त्याचा शोध घेवुन तुला कळवितो असे सांगितले. परंतु पिडता व तिच्या नातेवाईकास अनोळखी नंबर वरुन कॉल आला सदर बनावट इंन्स्टाग्राम आयडी बंद करावयाची असल्यास मला 06 हजार रुपये दयावे लागतील नाहीतर मी हे सर्व फोटो व व्हीडीओ सोशल मिडीयावर व्हायरल करुन टाकेल व ही गोष्ट इतर कोणास सांगितली तर विचार कर मी टायगर ग्रुपचा सदस्य आहे. मला धुळे जिल्हयातील सर्व लोक घाबरतात अशी धमकी दिली. त्यानंतर पिडीतेने कंटाळुन घराच्याच्या मदतीने सायबर पोलीस स्टेशन, धुळे येथे ऑनलाईन तक्रार दाखल केली होती.

त्यानंतर सायबर पोलीस स्टेशन, धुळे चे पो.नि.सुरेशकुमार घुसर यांनी मा. पोलीस अधीक्षक, श्रीकांत धिवरे सर यांना सदर तक्रारीबाबत संपुर्ण कल्पना दिली त्यांनी तात्काळ एक पथक तयार करण्यास सांगितले. तपास पथकाने सदर इन्स्टाग्राम आयडीचा वरुन वापरकर्त्याचे मोबाईल, इंटरनेट व ई - मेल आयडी यांचा शोध घेतले असता आरोपीने त्याच्या भावाचा मोबाईल नंबर व वडीलांचा ई - मेल चा वापर करुन 02 बनावट इन्स्टाग्राम आयडीच्या माध्यमातुन पिडीतेच्या फोटो व व्हीडीओ प्रसारीत केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यानुषंगाने सायबर पोलीस स्टेशन,धुळे यांनी आरोपी च्या राहत्या उमराणे गावातुन त्यास ताब्यात घेतले व त्याचे विरुध्द गुरंन 10/2024 बी.एन.एस. 64ए 356(2), 308(2), 351(4), आय.टी.ॲक्ट 66 (सी), (ई), 67 सह पोक्सो ॲक्ट 4 प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात 01 आरोपी अटक असुन त्यास न्यायालयात हजर केले असता त्यास न्यायालयाने दि.30/12/2024 पावेतो पोलीस कोठडी दिली आली आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, धुळे, मा. किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक, धुळे यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशनचे पो.नि. सुरेशकुमार घुसर, पोसई - प्रतिक कोळी, जगदीश खैरनार, असई - संजय पाटील, पोहेकॉ/ महेश मराठे, राजेंद्र मोरे, भुषण खलानेकर, पोशि/ हेमंत बागले, तुषार पोतदार, प्रसाद वाघ, चापोशि/ महेद्र जाधव मपोशि/शितल लोहार, प्रियंका देवरे, मृणालीनी भावसार यांचे पथकाने केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.नि. सुरेशकुमार घुसर हे करीत आहेत.

**पोलीस निरीक्षक,**
सायबर पोलीस स्टेशन, धुळे